ISSN : 2347-4777

# INTERNATIONAL JOURNAL OF CULTURAL STUDIES AND SOCIAL SCIENCES

(UGC approved Multi-disciplinary Peer-Reviewed Journal)
UGC Journal Serial No.49228 in 2019 list
Currently Indexed in UGC CARE LIST, Serial No.159 in 2022 list
Vol-20, Issue-1, No.21, January - June: 2024



Eds.
Amitava Roy, Ronan Paterson,
Bryan Reynolds, Subir Dhar, Papia Mitra

A Special Publication of
Tagore Gandhi Institute
The Shakespeare Society of Eastern India.

| | | |
|---|---|---|
| 20 | ELECTRONIC COMMERCE AND MANAGEMENT: A STUDY ON CHALLENEGES IN AN EMERGING ECONOMY | 89 |
| 21 | UNDERSTANDING THE BUYING BEHAVIOR OF CONSUMERS IN THE FAST-MOVING CONSUMER GOODS MARKET IN INDIA: TRENDS, INFLUENCES, AND IMPLICATIONS | 95 |
| 22 | AN ANALYSIS OF RISK TOLERANCE OF INDIVIDUAL INVESTOR USING GRAY RELATIONAL ANALYSIS METHOD | 98 |
| 23 | EMPLOYABILITY OF BUSINESS EDUCATION IN INDIA | 110 |
| 24 | भारतातील दारिद्रय आणि आर्थिक विषमता | 114 |
| 25 | आदिवासी महिलांच्या विकासात महिला स्वयंसहायता समूहाची भूमिका | 118 |
| 26 | बँकिंग उद्योगातील कार्य-जीवन संतुलनावर तांत्रिक प्रगती आणि त्यांचा प्रभाव | 128 |
| 27 | मराठी बखरीचे पुन: वाचन | 129 |
| 28 | साहित्य आणि समाज | 133 |
| 29 | EXAMINING INTEGRATED PROMOTION STRATEGIES IN AMRAVATI'S FURNITURE SECTOR | 139 |
| 30 | ब्रिटीशांच्या आर्थिक धोरणांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम एक अभ्यास | 142 |
| 31 | महाराष्ट्र राज्य औदोगिक विकास महामंडळातील उद्योग आणि उद्योजक | 149 |
| 32 | BARTERING SYSTEM TO CRYPTO CURRENCY: A JOURNEY IMPACTED BY DIGITAL INDIA MISSION | 150 |
| 33 | "पश्चिम विदर्भातील कृषी आधारीत लघुउद्योगांच्या व्यवस्थापनावर जागतिकीकरणाच्या परिणामांचे विश्लेषणात्मक अध्ययन" | 156 |
| 34 | A STUDY ON DIGITAL ECONOMY IN INDIA | 162 |
| 35 | ETHICAL DILEMMAS & CONSIDERATIONS: CODE OF CONDUCT FOR SCHOOL COUNSELORS | 167 |
| 36 | "स्त्रियांच्या प्रगतीत डॉ. बापासाहेब आंबेडकर यांचे योगदान" | 176 |
| 37 | मुद्रास्फीती नियंत्रणामध्ये रिजर्व बँक ऑफ इंडियाची भूमीका | 179 |
| 38 | FLOAT BOT TREND AND OPPORTUNITIES- A CASE STUDY OF JPC TECHNOLOGIES, BHAVNAGAR | 182 |
| 39 | ROLE OF NORKA IN THE REHABILITATION OF FOREIGN RETURNEES OF KERALA | 189 |

# मुद्रास्फीती नियंत्रणामध्ये रिजर्व बैंक ऑफ इंडियाची भूमीका

**डॉ. संजय उध्दवराव देशमुख** प्राध्यापक (वाणिज्य विभाग) श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुजी ता. अंजनगाव सुजी, जि. अमरावती ई-मेल:
sanjaydeshmukh.139@gmail.com

**गोषवारा:**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्य प्राप्ती पासून नियोजनाचे माध्यमातुन आर्थिक विकासाला प्रारंभ झाला. त्यामध्ये तुटीच्या अर्थप्रबंधनामुळे व भारतासोबत झालेल्या चीन, पाकीस्तान युध्दामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये चालनवाढ झालेली आहे व होत आहे. त्याचा परिणाम सामान्य लोकांना महागाईच्या झळा सोसाव्या लागत आहे. भारतीय रिजर्व बैंक आपल्या मात्रात्मक व गुणात्मक साधनाद्वारे स्फीती नियंत्रणाचे प्रयान करीत आहे. परंतु त्यामध्ये पुरेशे यश प्राप्त होतांना दिसत नाही. म्हणून स्फीतीवर प्रभाव टाकणारे इतर घटक शोधणे महत्वाचे आहे. त्याकरीता द्वितीय तथ्य संकलन पध्दतीचा वापर करुन तथ्य शोधण्याचा प्रयत्न सदर शोधपत्रा मधून करण्यात आलेला आहे. भारतीय रिजर्व बैंकने सप्टेंबर २०२२ मध्ये रेपो रेट मध्ये ०.५०% वाढ करुन सुद्धा किरकोळ महागाई दर जानेवारी २०२३ मध्ये ६.५२१% तर फेब्रुवारी २०२३ मध्ये ६.४४१% इतका होता. यावरुन रिजर्व बैंक ऑफ इंडियाला स्फीती नियंत्रणाला पुरेशे यश मिळत नसल्याचे दिसते. भारतीय अर्थव्यवस्थे मध्ये भ्रष्टाचार असल्यामुळे समांतर अर्थव्यवस्थेचे अस्तित्व दिसुन येते. जगामध्ये ज्या देशात भ्रष्टाचार कमी त्या देशामध्ये महागाई दर सुध्दा कमी आढळून येतो. भारतात भ्रष्टाचारमुळे लोकांच्या हातात कोणत्याही प्रकारची वस्तू व सेवा निर्माण न करता चलन येते. त्यामुळे मागणी मध्ये वृद्धी होते. तसेच लालफीतशाही मुळे व दफ्तर दिरंगाई मुळे प्रकल्प उभारणीस विलंब होतो. विदेशी गुंतवणुक आकर्षित होत नाही. परिणामता वस्तु व सेवेचे उत्पादन पुरवठा कमी प्रमाणात होवून वस्तु व सेवांच्या किमती वाढतात, विशेषतः समांतर अर्थव्यवस्थेवर रिजर्व बैंक ऑफ इंडियाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते.

**सुचक शब्द:**

रेपो रेट, तूट अर्थप्रबंधन, भ्रष्टाचार, चलनवाढ,

**प्रस्तावना:**

आज जगातील बहुतेक राष्ट्रांना स्फीतीच्या समस्येने प्रासलेले आहे. भारत देश सुध्दा त्यापासून सुटलेला नाही. कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अर्थव्यवस्थेमध्ये स्फीती मर्यादित असणे आवश्यक आहे. स्फीतीदर ३ ते ५ टक्के असणे हे अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी आवश्यक आहे. परंतु मुद्रास्फीतीचा दर हा ६% पेक्षा जास्त झाला तर सर्वसामान्य लोकांच्या उत्पन्नात त्या प्रमाणात वाढ होत नाही, गरीब व मध्यमवर्गीय लोकांना किमत वाढीमुळे आपल्या गरजा भागवीने जड होवून बसते. स्फीतीचा दर जास्त असणे म्हणजे राज्यकर्त्यांचे ते अपयश असते. सामान्य जनतेच्या कल्यानासाठी स्फीतीचा दर ६% पेक्षा कमी असावयास पाहीजे. परंतु भारताला स्वातंत्र मिळाल्यानंतर दोन युध्दांना तोंड द्यावे लागले व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातून विकासाला सुरुवात झाली. तेव्हा तुटीच्या अर्थप्रबंधन तत्वाचा अवलंब केला गेला त्यामुळे भारतीय अर्थव्यस्वेत आजतागायत चलनवाढ होताना

दिसून येते. त्याचा फटका सर्वसामान्य जनतेला बसत आहे. स्फीती नियंत्रणाची जबाबदारी ही केंद्रीय अधिकोष म्हणजे रिजर्व बँक ऑफ इंडिया कडे आहे. रिजर्व बँक ऑफ इंडिया आपल्या मात्रात्मक व गुणात्मक साधनांचा वापर करून स्फीती नियंत्रणात का ठेवू शकली नाही हा अभ्यासाचा विषय आहे. जर रिजर्व बँक ऑफ इंडिया स्फीती नियंत्रणामध्ये अपयशी होत असेल तर, भारतीय अर्थव्यवस्थेत मुद्रास्फीती आवाक्या बाहेर जाण्याची कारणे काय सुध्दा शोध घेणे गरजेचे आहे. आज जगाच्या पातळीवर विकसीत देशांमध्ये स्फीतीचा दर नियंत्रीत दिसतो. परिणामतः त्या दिकाणी उपभोग्य वस्तु व सेवांच्या किमती ह्या सर्वसामान्य लोकांच्या आवाक्यामध्ये असतात. भारता सारख्या विकसनशील देशामध्ये आज स्वातंत्र्य मिळवून ७५ वर्षा पेक्षा जास्त कालावधी होवून, नियोजनाच्या माध्यमातुन आर्थिक विकास सुरु असतांना सुध्दा स्फीती नियंत्रणात का राहत नाही हा महत्वपूर्ण संशोधनाचा विषय आहे.

**संशोधनाचे महत्व:** भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये वाढती महागाई ही कायमस्वरुपी समस्या होवून बसलेली आहे. रिजर्व बँक ऑफ इंडिया व भारत सरकार महागाई दरावर नियंत्रण ठेवण्यात अपयशी होतांना दिसत आहे. त्याचे कारण शोधण्याचा प्रयत्न या शोध पत्रा मध्ये करण्यात आलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत असलेला भ्रष्टाचार म्हणजे समांतर अर्थव्यवस्था यावर रिजर्व बँक ऑफ इंडियाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. त्यामुळे वस्तु च सेवांच्या किमती वाढण्यामध्ये भ्रष्टाचाराची महत्वपूर्ण भूमीका असल्याचे दिसून येते.

**उद्देश:**

१) भारतीय अर्थव्यवस्थेच्या मुद्रास्फीती नियंत्रणामध्ये रिजर्व बँक ऑफ इंडियाची भूमीका जाणून घेणे.

२) भारतीय मुद्रास्फीती निर्माण करण्यात इतर घटकांचा प्रभाव जाणून घेणे.

**गृहितके:**

१) भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मुद्रास्फीती नियंत्रण करण्यामध्ये रिजर्व बँक ऑफ इंडिया यशस्वी होतांना दिसत नाही.

२) मुद्रास्फीती निर्माण होण्यास इतर घटक सुध्दा कारणीभूत आहेत.

**संशोधन पध्दती:**

सदर अध्ययनाकरीता द्वितीयक तथ्य संकलन पध्दतीचा आधार घेतलेला आहे. पुस्तके व इंटरनेट वरुन मिळालेल्या माहितीचा उपयोग संशोधन्नाकरीता करण्यात आलेला आहे.

**परिणाम व चर्चा :**

मुद्रास्फीती नियंत्रणामध्ये प्रथम स्फीतीचा अर्थ समजणे महत्वपूर्ण आहे. अर्थव्यवस्थेमध्ये वस्तु व सेवांच्या किंमतीमध्ये निरंतर वाढ होत असेल तर त्या अर्थव्यवस्थेला मुद्रास्फीती असे संबोधले जाते. अर्थव्यवस्थे मध्ये जेव्हा वस्तु व सेवेच्या पुरवठ्यापेक्षा वस्तु व सेवांच्या मागणीमध्ये वाढ होत असेल तर स्फीतीची अवस्था निर्माण होते. स्फीतीवर नियंत्रण ठेवण्याकरीता वस्तू व सेवांच्या मागणीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न होणे गरजेचे आहे. तसेच वस्तु व सेवांचा पुरवठा अर्थव्यवस्थेमध्ये कसा वाढवीता येइल याद्दष्टीने सुध्या प्रयत्न होणे गरजेचे आहे. वस्तू व सेवांच्या उत्पादनामध्ये व

पुरवठ्यामध्ये येणारी अडचण दूर करणे गरजेचे आहे. वस्तु व सेवांची मागणी ही अर्थव्यवस्थेमधील लोक व संस्थांद्वारा होत असते. जेव्हा लोकांच्या हातामध्ये अतिरिक्त मुद्रा येतात तेव्हा अर्थव्यवस्थेमध्ये वस्तु व सेवांची मागणी वाढते, परिणामता किमत पातळी वाढते, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये चलन वाढीची क्रिया ही स्वातंत्र्योत्तर काळापासून आजतागायत सुरु आहे. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतामध्ये जेव्हा पंचवार्षिक योजानांच्या माध्यमातून विकास सुरु केला गेला तेव्हा तुटीच्या अर्थप्रबंधनाचे माध्यमातून प्रत्येक योजनेमध्ये अर्थव्यवस्पेत चलनवाढ झालेली दिसुन येते. तसेच भारत-पाकीस्तान, भारत-चीन युध्द यामुळे सुध्दा भारतीय अर्थव्यवस्थेत चलनवाढ झाल्याचे आढळून येते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या बाबतीत अर्थतज्ञांचे मते मुद्रास्फीतीचा दर ३% ते ५% असेल तर अर्थव्यवस्थेच्या विकासाला पोषक आहे. परंतु मुद्रास्फीतीचा दर हा जर ६% पेक्षा जास्त असेल तर तो चांगला मानाला जात नाही कारण या अवस्थेत वस्तु व सेवांच्या किमती मध्ये झालेली वाढ ही जास्त असते. त्या मानाने सामान्य लोकांना मिळणारे उत्पनन जसे वेतन, मजूरी वाढलेली नसते. परिणामता या बहुसंख्य लोकांना आपल्या उत्पन्नामधून पुर्वी इतक्या वस्तू व सेवा खरेदी करणे शक्य होत नाही. व त्यांच्या जीवनमानाचा स्तर खालावतो.

अर्थव्यवस्थेमधील चलनवाढ नियंत्रीत करणे व स्फीतीवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही केंद्रीय अधिकोषाकडे असते. भारतीय केंद्रीय अधिकोष म्हणजे रिजर्व बैंक ऑफ इंडिया चलनवाढ नियंत्रीत करुन स्फोती नियंत्रण करण्यामध्ये कितपत यशस्वी ठरली आहे हे महत्वपूर्ण आहे. भारतीय रिजर्व बँक चलनवाढ नियंत्रीत करण्यासाठी i) मात्रात्मक साधन ii) गुणात्मक साधनाचा वापर करते. त्यापैकी मात्रात्मक साधन चलनवाढ नियंत्रण करण्यासाठी रिजर्व बैंक प्रामुख्याने वापरते. त्यामधील प्रमुख साधन म्हणून रेपो रेट (Repurchasing Option Rate) या साधनाचा वापर करणे अर्थव्यवस्थे मधील व्यापारी बैंका रिजर्व बैंक ऑफ इंडिया कडे मान्यताप्राप्त प्रतिभूती गहाण ठेवून कर्ज घेतात. त्या कर्जावर रिजर्व बॅकेकडून जो व्याज दर आकारला जातो त्याला रेपो रेट असे म्हटले जाते. जेव्हा अर्थव्यवस्थेमध्ये मुद्रा परिमाण जास्त होवून स्फीतीची अवस्था निर्माण होते. तेव्हा रिजर्व बैंक ऑफ इंडिया रेपो रेट मध्ये वृध्दी करते त्याचा परिणाम व्यापारी बैंकाना कर्ज महाग पडते. म्हणून व्यापारी बैंक आपले व्याजदर वाढवितात परिणामता व्यापारी बैंकाची प्रत्यय निर्मीती कमी होते व अर्थव्यवस्थेमधील चलनवाढीला आळा बसतो व स्फीतीवर नियंत्रण प्राप्त करता येते. परंतु अलीकडे हे साधान हवे तेवढे सफल होतांना दिसुन येत नाही. दै. भास्कर मधील प्रकाशीत वृत्तानुसार किरकोळ महागाई दर हा जानेवारी २०२२-६.०१%,

फेब्रुवारी २०२२-६.०७%, मार्च २०२२-६.९५%, एप्रील २०२२-७.७९%, मे २०२२-७.०४% जून २०२२-७.०१%, जुलै २०२२-६.७०%, ऑगस्ट २०२२-७.००%, सप्टेंबर २०२२- ७.४१% इतका म्हणजे ६% पेक्षा जास्त होता. हा महागाई दर रिजर्व बैंकेला आपली प्रत्यक्ष नियंत्रणाची साधने वापरुन सुध्दा ६% पेक्षा कमी ठेवण्यात अपयश आले. रिजव बैंक ऑफ इंडियाने रेपो रेट मध्ये सप्टेंबर २०२२ मध्ये ०.५०% वाढ करुन सुध्दा किंमत बाढ़ नियंत्रीत करता आली नाही. किरकोळ महागाई दर जानेवारी २०२३ मध्ये ६.५२%, तर फेब्रुवारी २०२३ मध्ये ६.४४% इतका होता. मुद्रास्फीती दर नियंत्रीत करण्यामध्ये रिजर्व बैंकेचे अपयश लक्षात घेता इतर आर्थिक बाकी सुध्दा चलनवाढीस, किमत पातळी वाढीसाठी कारणीभुत ठरत आहेत काय याकडे सुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे. जसे भारतीय अर्थव्यवस्थेत असलेला भ्रष्टाचार त्यामुळे निर्माण झालेली समांतर अर्थव्यवस्था किंमत वाढीसाठी कारणीभूत आहे काय? हे पाहणे महत्वाचे आहे.

जागतिक बँकेच्या अहवालावरून अर्थव्यवस्थेतील भ्रष्टाचार व किरकोळ महागाई दर यामध्ये साधर्म्य असल्याचे दिसून येते.

| सन २०२२ च्या आकडेवारी नुसार कमी भ्रष्टाचार असलेले देश व त्यांचा महागाई दर (जास्त गुण संख्या भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी) | | | | सन २०२२ च्या आकडेवारी नुसार जास्त भ्रष्टाचार असलेले देश व त्यांचा महागाई दर (कमी गुण संख्या- भ्रष्टाचाराचे प्रमाण जास्त) | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | देश | गुण संख्या | महागाई दर | अ.क्र. | देश | गुण संख्या | महागाई दर |
| १ | डेन्मार्क | ९० | ०.८१% | १ | सुदान | १६ | १३८.८१% |
| २ | न्यूझीलॅन्ड | ८७ | १.६०% | २ | नायजेरिया | २५ | १८.८५% |
| ३ | नार्वे | ८४ | २.७६% | ३ | उजबेकिस्तान | २६ | ११.४५% |
| ४ | ऑस्ट्रेलिया | ७५ | १.९१% | ४ | पाकिस्तान | ३१ | १९.८७% |
| ५ | जपान | ७३ | ०.९९% | ५ | इजीप्त | ३३ | १३.९०% |
| | | | | ६ | भारत | ४० | ६.७०% |

वरील आकडेवारी वरून ज्या देशातील अर्थव्यवस्थेमधील जास्त भ्रष्टाचार दिसुन येतो त्या अर्थव्यवस्थेत महागाई दर हा जास्त दिसुन येतो. याउलट कमी भ्रष्टाचार असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये महागाई दर हा कमी असलेला दिसुन येतो, यावरुन भ्रष्टाचार व म्हागाई दर यामध्ये साधर्म्य दिसुन येते भ्रष्टाचार असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये अतिरिक्त चलनवाढ होणे साहजीक आहे. भ्रष्ट्र मार्गाने कमावलेल्या पैशामधून मागणी वाढते परंतु हे अर्थार्जन करीत असतांना वस्तु व सेवेची निर्मीती होत नाही. मागणीचे मानाने वस्तु व सेवांचा पुरवठा कमी होतो तसेच भ्रष्ट मार्गाने कमाविलेल्या पैशावर रिजर्व बँक ऑफ इंडियाचे कोणतेही नियंत्रण राहत नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणने भ्रष्टाचार असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये लालफितशाही व दफ्तर दिरंगाईमुळे प्रकल्प उभारणीस वेळ लागलो. अशा देशात विदेशी गुंतवणूक आकर्षीत होत नाही, परिणामता वस्तु व सेवांचे उत्पादन कमी राहून पुरवठा सुध्दा कमी होतो. त्याचा परिणाम वस्तु व सेवांच्या किंमतीमध्ये वाढ होते. अशाप्रकारे भारतीय मुद्रास्फीतीवर नियंत्रण ठेवणे हे रिजर्व बँक ऑफ इंडियाच्या आवाक्यातील बाब नसून मुद्रास्फीतीवर प्रभाव टाकामाच्या इतर आर्थिक घटकांवर सुध्दा लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्योत्तर काळापासून पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकास करण्याचा प्रयत्न होत आहे. प्रत्येक योजने मध्ये तुटीच्या अर्थप्रबंधनामुळे व भारत-पाकिस्तान, भारत-चीन यांच्यामध्ये झालेल्या युध्दाचा परिणाम स्वरूप भारतीय अर्थव्यवस्थेत चलनवाढ झाल्याचे दिसुन येते. परिणामता उपभोग्य वस्तू व सेवांच्या किमती मध्ये सतत वाढ होत आहे व रुपयाचे अवमुल्य होत आहे. भारतीय रिजर्व बँक ऑफ इंडियाने मात्रात्मक व गुणात्मक साधनांद्वारा मुद्रास्फीती नियंत्रीत करण्याचा वेळोवेळी प्रयत्न केला आहे. परंतु त्यामध्ये पुरेशे यश मिळालेले दिसुन येत नाही, जानेवारी २०२२ मध्ये किरकोळ महागाई दर ६.०१% तर सप्टेंबर २०२२ मध्ये ७.४१% इतका होता. रिजर्व बँक ऑफ इंडियाने रेपो रेट सप्टेंबर मध्ये ०.५०% वाढ करून सुध्दा किमत बाढ नियंत्रणात आली नाही.

फेब्रुवारी २०२३ मध्ये महागाई दर ६.४४९% होता. मुद्रास्फीतीवर प्रभाव टाकणारे इतर घटक सुध्दा महत्वपूर्ण असे दिसून येतात जसे भ्रष्टाचार असलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये किरकोळ महागाई दर सुध्दा जास्त असल्याचे दिसून येते. भारताची भ्रष्टाचार बाबतची गुणसंख्या ४० इतकी आहे. जितकी गुण संख्या कमी तीतका देशामध्ये भ्रष्टाचार जस्त असतो, भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात असल्यामुळे समांतर अर्थव्यवस्थेचे अस्तित्व आहे. त्यावर रिजर्व बँकेचे कोणतेही नियंत्रण राहत नाही. अनार्जित उत्पन्न कमविल्यामुळे चलनवाढ होवून किमत पातळी वाढते. भ्रष्टाचारामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत दफ्तर दिरंगाई व लालफितशाही मुळे प्रकल्प उभारणीस वेळ लागतो तसेच विदेशी गुंतवणूक आकर्षित होत नाही. परिणामता अर्थव्यवस्थेमध्ये वस्तु व सेवेच्या पुरवठा वाढत नाही व वस्तुच्या किमती वाढतात.

**संदर्भ :**

१) डॉ. कुलकणी बी. डी. अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती १ २००७ सप्टेंबर
२) डॉ. ढमढेरे एस. बी. अर्थशास्त्रीय संशोधन पध्दती २००७ सप्टेंबर
३) डी. झामरे जी. एन भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र जून २०१५
४) https://www.gogle.com